MHKO150002992022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २५/०७/२०२२ |
| नोंद तारीख | : | २५/०७/२०२२ |
| निकाल तारीख | : | ०९/११/२०२२ |
| कालावधी | : | व. म. दि.<br>०० ०३ १५ |

**<u>आजरा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी : श्री. एस. पी. जाधव)

CNR NO. MHKO150002992022

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला नं. ९९/२०२२</u>** **<u>निशाणी नं. /ब</u>**

**महाराष्ट्र शासन**
द्वारा, निरीक्षक, } **<u>अभियोग पक्ष</u>**
राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर.

**विरुध्द**

**किरण लक्ष्मण जाधव.**
वय ३५ वर्षे, व्यवसाय - मोलमजूरी, } **<u>आरोपी</u>**
रा. उत्तूर, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

दोषोरापः- मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये.

..........................................................................................

श्री. एस. बी. कांबळे, सरकारी वकिल, अभियोग पक्षातर्फे.
श्री. एस. एस. इंजल वकिल, आरोपीतर्फे.

..........................................................................................

**<u>न्यायनिर्णय</u>**
(घोषित दिनांकः ०९/११/२०२२)

आरोपीने दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

२. अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालील प्रमाणेः-

फिर्यादी ए. ए. यादव, जवान यांनी दिनांक २७.०१.२०२२ रोजी अशी फिर्याद दिली की, सदर दिवशी गुप्त बातमीदारामार्फत विनापरवाना दारु विक्रीची मिळाले बातमी प्रमाणे छापा कारवाईकरीता पोलिस स्टाफ व पंचांसहीत खाजगी वाहनाने उत्तूर, ता. आजरा येथे जाऊन बातमीचे ठिकाणी पाहणी केली असता, मोरया चायनीज सेंटरजवळ एका पत्र्याच्या शेडचा संशय आल्याने त्या ठिकाणी अचानक छापा घातला. तेथे आरोपी एका कागदी पुठ्ठयाच्या बॉक्समध्ये देशी दारु रॉयल चॉईस संत्रा १८० मिलीच्या एकूण १६ सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या दारु विक्री करणेच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला. सदरचा मुद्येमाल जप्त केला. सदर मुद्येमालातून रासायनीक पृथःकरणकामी नमुना काढला, घटनास्थळी पंचनामा केला व आरोपीविरुध्द त्यांनी फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरुन गु.र.क्रं. २३/२०२२ नोंद झाला. सदर प्रकरणात तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांचे जवाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी विरुध्द नि. क्र. ८ अन्वये गुन्हयाचा तपशील निश्चित केला. सदरील तपशील आरोपीस त्याच्या भाषेत समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा

मान्य नसल्याचे सांगून संपरिक्षा घेण्याची मागणी केली. त्यामुळे प्रकरण पुढे चालविणेत आले.

५. अभियोग पक्षातर्फे श्री. एस. बी. कांबळे अभियोक्ता आरोपी तर्फे श्री. एस. एस. इंजल यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षाचा पुरावा व आरोपीने घेतलेलया बचावाचा विचार करता खालील मुद्दे विचारार्थ उपलब्ध झाले असून मी त्याची कारणमिमांसा व निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, दि. २७.०१.२०२२ रोजी उत्तूर, ता. आजरा येथे बेकायदेशीररित्या आरोपी स्वतःचे कब्जामध्ये देशी दारु पहिली धार संत्राच्या १८० मिलीच्या १६ सिलबंद बाटल्या दारु विक्री करणेच्या उद्देशाने बाळगलेल्या स्थितीत मिळून आला? | नाही. |
| २. | अंतीम आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

<u>**कारणमिमांसाः**</u>

<u>**मुद्दा क्र. १ व २ करिताः**</u>

६. आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने सा. क्र. १ रविंद्र राजहंस सोनवणे यांची साक्ष नि. क्र. ९ वर नोंदवली आहे.

७. सा. क्र. १ यांनी त्यांच्या साक्षीत, दिनांक २७.०१.२०२२ रोजी पोलिसांनी त्यांचेसमक्ष कोणताही जप्ती पंचनामा केला नाही. तसेच पंचनामेतील मजकूर त्यांना मान्य नाही असे कथन केले आहे. त्यामुळे पंचनामा सिध्द झाला नाही.

८. सा. क्र. १ यांनी पंचनामेतील मजकूर त्यांना मान्य नाही असे कथन केले आहे. अभियोग पक्षाने केवळ पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली आहे. अभियोग पक्षाने फिर्यादी, इतर पंच व साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे फिर्याद सिध्द झाली नाही.

९. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने सी. ए. अहवाल दाखल केला नाही. त्यामुळे जप्त केलेला मुद्येमाल हा दारु आहे हे सिध्द होत नाही. तसेच सा. क्र. १ ने आरोपीचे ताबेतून दारु जप्त केले असे कथन केलेले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे आरोप संशयापलिकडे जावून सिध्द केले नाहीत. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे. व मुद्दा क्र. २ चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २५५ (१) प्रमाणे मंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्दबातल करण्यांत येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेला मुद्देमाल दारु जर पुर्वी विल्हेवाट लावली नसेल तर अपील कालावधी संपल्यानंतर, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय यांचेकडे विल्हेवाटीसाठी पाठविण्यात यावे. तसेच इतर मुल्यहिन मुद्येमाल अपील कालावधीनंतर नाश करणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर केले.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHARADCHANDRA PANDITRAO JADHAV
Date: 2022.11.09 16:24:37 +0530

(एस. पी. जाधव)

दिनांक : ०९.११.२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आजरा.

## **<u>Certificate</u>**

I affirm that the contents of this P.D.F file Judgment / Order are same, word to word, as per the original Judgment / Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Y.S. Chavan |
| Name of Court | J.M.F.C. Ajara |
| Judgment / Order dictated on | 09-11-2022 |
| Judgment / Order typed on | 09-11-2022 |
| Judgment / Order signed by the P. O. on | 09-11-2022 |
| Judgment / Order uploaded on | 09-11-2022 |